दैनिक
# हिंदू प्रकाशवार्ता
epaper.hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
Web portal : hinduprakashwarta.com
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ❀ शुक्रवार, दि. १९ जून २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : ६० ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com

## विरोधकांना संपवण्याचे मनसुबे; ट्रेलरनंतर आता 'पिक्चर'ची प्रतीक्षा

महाराष्ट्राच्या राजकारणातील शह-काटशहाचा खेळ आता एका अत्यंत रंजक आणि तितक्याच गंभीर वळणावर येऊन पोहोचला आहे. शिवसेनेच्या वर्धापन दिनानिमित्त झालेल्या मेळाव्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विरोधकांना दिलेला थेट इशारा राज्याच्या राजकारणात आगामी काळात येणाऱ्या मोठ्या वादळाचे संकेत देत आहे. एका बाजूला पक्षाला लागलेली गळती रोखण्यासाठी विरोधकांचे प्रयत्न

---> अग्रलेख - पान 2 वर

## टेलिग्रामवरील बंदी 22 जूनपर्यंत कायम

**नवी दिल्ली:** इन्स्टंट मेसेजिंग प्लॅटफॉर्म 'टेलिग्राम'ला दिल्ली उच्च न्यायालयाने मोठा धक्का दिला आहे. केंद्र सरकारने २२ जूनपर्यंत लागू केलेल्या तात्पुरत्या बंदीविरोधात टेलिग्रामने दाखल केलेली याचिका न्यायालयाने फेटाळून लावली आहे. त्यामुळे तूर्तास भारतात टेलिग्रामवरील निर्बंध कायम राहणार आहेत. आगामी २१ जून रोजी होणाऱ्या 'नीट-युजी २०२६' च्या पुनर्परीक्षेच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने टेलिग्रामवर तात्पुरती बंदी घालण्याचा निर्णय घेतला होता. परीक्षेतील गैरप्रकार, पेपरफुटी आणि संघटित फसवणुकीसाठी या प्लॅटफॉर्मचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जात असल्याची माहिती तपास यंत्रणांना मिळाली होती.

# बाजार समिती की कचराकुंडी?; लाखोंची उलाढाल करणारी बाजारपेठ घाणीच्या विळख्यात

## सडलेल्या आंब्यांचे ढिगारे, नारळाच्या करवंट्या आणि प्लास्टिक कचऱ्याने परिसर अस्वच्छ; पावसाळ्यात दुर्गंधी व रोगराईचा धोका







छत्रपती संभाजीनगर : कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरात कचऱ्याचे पडलेले ढिगारे हे नागरिकांच्या आरोग्यास धोकादायक असून याची गंभीर दखल घेवून संबंधितांनी पावसाच्या अगोदर योग्य निर्णय घेण्याची अपेक्षा.

हिंदू प्रकाशवार्ता : सिद्धेश्वर थोर

**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाड्यातील सर्वात मोठ्या कृषी उत्पन्न बाजार समित्यांपैकी एक असलेल्या छत्रपती संभाजीनगर कृषी उत्पन्न बाजार समितीत सध्या घाणीचे साम्राज्य पसरल्याचे चित्र समोर आले आहे. शेतकरी, व्यापारी आणि ग्राहकांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असलेल्या या बाजारपेठेत सडलेली फळे, भाजीपाल्याचा कचरा, नारळाच्या करवंट्या, प्लास्टिक पिशव्या आणि टाकाऊ साहित्याचे ढिगारे जागोजागी पडल्याने स्वच्छतेच्या व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

दररोज हजारो शेतकरी आपला कृषी माल विक्रीसाठी या बाजार समितीत आणतात. तसेच व्यापारी वर्गाकडून मोठ्या प्रमाणात खरेदी-विक्री केली जाते. लाखो रुपयांची उलाढाल होणाऱ्या या महत्त्वाच्या बाजारपेठेची ओळख शेतकऱ्यांच्या आर्थिक केंद्र म्हणून आहे. मात्र परिसरात ठिकठिकाणी साचलेला कचरा आणि सडलेला माल पाहता बाजार समितीची प्रतिमा मलिन होत असल्याची भावना नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

### बाजार समितीतील प्रमुख समस्या

- सडलेल्या आंब्यांचे व फळभाज्यांच्या कचऱ्याचे ढिगारे
- नारळाच्या करवंट्या व प्लास्टिक कचरा रस्त्यावर
- परिसरात दुर्गंधीचा त्रास
- पावसाळ्यात घाण अधिक साचण्याची शक्यता
- माशा, डास व रोगराईचा धोका
- ग्राहक, व्यापारी व शेतकऱ्यांमध्ये नाराजी
- नियमित स्वच्छता व कचरा व्यवस्थापनाची मागणी

### बाजार संकुल नावाच्या पाटीवरतीच दुसरी बुकिंगच्या पाटी

"बाजार समिती परिसरात घाण करणे हा कोणाचाही उद्देश नाही. प्रशासनाकडून नियमित साफसफाई सुरू असून मागील काही काळात मोठ्या प्रमाणात साचलेली घाण हटविण्यात आली आहे. उर्वरित परिसरही स्वच्छ करण्यात येत आहे. बाजार समिती स्वच्छ ठेवणे ही प्रशासनाबरोबरच शेतकरी आणि व्यापाऱ्यांचीही जबाबदारी आहे. सर्वांनी सहकार्य करून परिसरात कचरा टाकणे टाळावे," असे आवाहन कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती श्रीरामबाबा शेळके यांनी केले. श्री हरिभाऊ बागडे (नाना) शेतकरी बाजार संकुल नावाच्या पाटीवरतीच दुसरी बुकिंगच्या पाटी या प्रश्नाबाबत विचारले असता, संबंधित प्रकरणाची माहिती घेऊन योग्य ती माहिती दिली जाईल, असे सभापती शेळके त्यांनी स्पष्ट केले.

बाजार समिती परिसरातील काही भागांत सडलेल्या आंब्यांचे ढिगारे पडून असल्याचे दिसून आले. त्याचबरोबर अननसाचे अवशेष, नारळाच्या करवंट्या, प्लास्टिक कचरा आणि इतर टाकाऊ वस्तूंचे ढिगारे उघड्यावर पडलेले आहेत. या कचऱ्यातून दुर्गंधी पसरत असून परिसरात माशा आणि डासांचे प्रमाण वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

विशेष म्हणजे शहरासह ग्रामीण भागातील अनेक नागरिक ताजा भाजीपाला व फळे खरेदी करण्यासाठी बाजार समितीत येत असतात. मात्र परिसरातील अस्वच्छतेमुळे ग्राहकांमध्ये नाराजीचा सूर उमटत आहे.

पावसाळा सुरू झाल्याने सडलेल्या कचऱ्यावर पावसाचे पाणी साचून दुर्गंधी आणखी वाढण्याची शक्यता आहे. तसेच अशा परिस्थितीत आरोग्याच्या समस्याही निर्माण होऊ शकतात, अशी भीती नागरिकाकडून व्यक्त केली जात आहे.

व्यापारी आणि शेतकरी वर्गाकडूनही नियमित स्वच्छता, कचरा संकलनासाठी स्वतंत्र व्यवस्था आणि कचरा व्यवस्थापनाचे प्रभावी नियोजन करण्याची मागणी होत आहे. बाजार समिती प्रशासनाने तातडीने व्यापक स्वच्छता मोहीम राबवून परिसर स्वच्छ ठेवावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## थोडक्यात वार्ता


### राज्यात 25 जूननंतर मान्सून सक्रीय होणार, नवा अंदाज

**मुंबई :** देशभरात मान्सूनच्या प्रगतीने पुन्हा एकदा मोठी विश्रांती घेतल्याचे चित्र दिसत आहे. सलग तिसऱ्या वर्षी मान्सूनची वाटचाल जूनच्या मध्यात मंदावली आहे. त्यामुळे अनेक भागांमध्ये पावसाची प्रतीक्षा लांबली आहे. हवामान तज्ज्ञांच्या मते येत्या काही दिवसांत वातावरणात अनुकूल बदल होण्याची शक्यता असून, जूनच्या अखेरीस महाराष्ट्रात मान्सून पुन्हा सक्रिय होऊ शकतो. महाराष्ट्रासह देशातील अनेक भागांमध्ये मान्सूनची गती मंदावल्याने शेतकरी, नागरिक आणि प्रशासनाची चिंता वाढली आहे. हवामान अभ्यासक माणिकराव खुळे यांच्या माहितीनुसार, २३ जूनपासून वातावरणात बदल होण्याची चिन्हे दिसू शकतात. त्यानंतर २५ जून ते १ जुलै या कालावधीत मुंबई, कोकण आणि किनारपट्टी भागात मान्सून अधिक सक्रिय होण्याचा अंदाज आहे. त्याचबरोबर सह्याद्री पर्वत रांगा ओलांडून मध्य महाराष्ट्र, विदर्भ आणि पूर्व मराठवाड्यातही पावसाचे आगमन होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

### चालण्याचा हक्क हा मूलभूत अधिकार- सर्वोच्च न्यायालय

**नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालयाने एका ऐतिहासिक निर्णयात चालण्याचा हक्क हा संविधानातील मूलभूत अधिकार असल्याचे स्पष्ट केले आहे. न्या. पी. एस. नरसिंह आणि न्या. ए. एस. चंदुरकर यांच्या खंडपीठाने सांगितले की फुटपाथांवर पायी चालणाऱ्या नागरिकांचा हक्क हा रस्त्यावरील वाहनांच्या हालचालींपेक्षा अधिक महत्त्वाचा आहे. सर्वोच्च न्यायालयाने नमूद केले की हा अधिकार संविधानाच्या अनुच्छेद 19(1)(d) (देशात कुठेही मुक्तपणे फिरण्याचा हक्क) आणि अनुच्छेद 21 (जीवन व वैयक्तिक स्वातंत्र्याचा हक्क) अंतर्गत पूर्णपणे संरक्षित आहे.खंडपीठाने स्पष्ट केले की ज्या रस्त्यांची निर्मिती केली जाते, तेथे पादचाऱ्यांसाठी स्वतंत्र आणि सीमांकित फुटपाथ असणे तसेच त्यांचे योग्य देखभाल करणे हे स्थानिक प्रशासनाचे बंधनकारक कर्तव्य आहे. हा एक कायदेशीररित्या अंमलात आणता येणारा अधिकार असल्याचेही न्यायालयाने ठामपणे सांगितले. सुप्रीम कोर्टाचा हा निर्णय एका मोटार अपघात प्रकरणाशी संबंधित आहे, ज्यात पाच वर्षांच्या मुलाचा मृत्यू झाला होता. सकाळी शाळेत जात असताना एका टँकरने त्याला धडक दिली होती. त्या ठिकाणी फुटपाथ किंवा पादचारी क्रॉसिंग नव्हते. सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणात मुलाच्या वडिलांना देण्यात येणारी भरपाई वाढवून 11,44,628 रुपये इतकी केली आहेत. तसेच 2 महिन्यांच्या आत ही रक्कम देण्याचे आदेश देखील कोर्टाने आहेत. तसेच उच्च न्यायालयाने दिलेला कमी भरपाईचा निर्णयही रद्द करण्यात आला आहे.

### निदा खानच्या अर्जावर आता 25 तारखेला पुढील सुनावणी



**नाशिक :** नाशिकमधील बहुचर्चित TCS प्रकरणातील निदा खान प्रकरणात मोठी अपडेट समोर आली आहे. नाशिकमधील अत्याचार, धर्मांतरण प्रकरणी निदा खान, तौसिफ अत्तार आणि दानिश शेख यांच्या जामीन अर्जावरील सुनावणी आज न्यायालयात पार पडली. या प्रकरणात न्यायालय काय निर्णय देते याकडे सर्वांचे लक्ष लागून होते. दरम्यान, न्यायालयात यापूर्वी आरोपींच्या वकिलांची बाजू ऐकून घेतल्यानंतर आज न्यायालयाने सरकारी पक्षाचा युक्तिवाद आणि बाजू ऐकून घेतली. दोन्ही बाजूंचं म्हणणे ऐकल्यानंतर न्यायालयाने आपला निकाल तूर्तास राखून ठेवला आहे. या हायप्रोफाईल प्रकरणाची पुढील सुनावणी आता 25 तारखेला होणार आहे. तोपर्यंत आरोपींचा मुक्काम तुरुंगातच राहणार असून 25 जूनला निदा खान आणि इतर दोघांबाबत पुन्हा न्यायालयात सुनावणी होईल.

## "खरं की काय"




# वृत्ताची दखल : अखेर जिल्हाधिकारी निवासस्थानावरील नामफलक बदलला

**छत्रपती संभाजीनगर :** जिल्हाधिकारी निवासस्थानावरील नामफलकावर माजी जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांचे नाव कायम असल्याचा मुद्दा हिंदू प्रकाश वार्तांने 30 एप्रिल रोजीच्या अंकात ठळकपणे मांडल्यानंतर प्रशासनाला अखेर जाग आली आहे. जिल्हाधिकाऱ्यांची बदली होऊन सुमारे दोन महिने उलटून गेले होते, मात्र निवासस्थानाच्या प्रवेशद्वारावरील फलकावर अद्यापही माजी जिल्हाधिकाऱ्यांचेच नाव कायम असल्याचे वास्तव हिंदू प्रकाश वार्तांने छायाचित्रासह प्रसिद्ध केले होते.




### नागरिकांची चौकस नजर




"जिल्हाधिकारी कार्यालयात विनय गौडा जी.सी. जिल्हाधिकारी पदी रुजू होवून जवळपास एक महिना होत आहे तरी, जिल्हाधिकारी निवासस्थानाबाहेरील बोर्डावर अजूनही माजी जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांचे नाव असल्याने प्रशासनाचा बेजबाबदारपणा दिसून येत आहे." छायाचित्र | नितीन दांडगे, छत्रपती संभाजीनगर

तुम्हीही तुमच्या चौकस नजरेत असे काही आल्यास आपले नाव आणि पत्ता देवून आपल्या इमेल आयडीवर फोटो पाठवू शकता. चला तर मग उद्या आपल्या नावासोबत फोटो लावूया..!

या वृत्तामुळे प्रशासनाच्या कारभारातील निष्काळजीपणा समोर आला. जिल्ह्याच्या सर्वोच्च प्रशासकीय अधिकाऱ्याच्या निवासस्थानावरील नामफलकच अद्ययावत नसल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. हिंदू प्रकाश वार्तांने हा मुद्दा उचलून धरल्यानंतर संबंधित यंत्रणा खडबडून जागी झाली आणि काही दिवसांतच नामफलक बदलण्याची कार्यवाही करण्यात आली.

आता जिल्हाधिकारी निवासस्थानावर विद्यमान जिल्हाधिकारी विनय गौडा यांचे नाव असलेला नवीन फलक लावण्यात आला आहे. विशेष म्हणजे, हा बदल हिंदू प्रकाश वार्तामध्ये वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतरच करण्यात आल्याने माध्यमांच्या पाठपुराव्याची आणि लोकहिताच्या प्रश्नांवरील पत्रकारितेची प्रभावी दखल प्रशासनाला घ्यावी लागल्याचे स्पष्ट झाले आहे.

प्रशासनातील अशा किरकोळ वाटणाऱ्या पण महत्त्वाच्या त्रुटींकडे लक्ष वेधून त्यात सुधारणा घडवून आणण्याचे काम हिंदू प्रकाश वार्तांने केले असून, वृत्ताची दखल घेत अखेर नामफलक अद्ययावत झाल्याने नागरिकांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

### प्रसार माध्यमासमोर विधाने करणे भोवले

# मोटर वाहन निरीक्षक गजेंद्र पाटील निलंबित

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी :** येथील उप प्रादेशिक वाहन कार्यालयामधील मोटार वाहन निरीक्षक गजेंद्र तानाजी पाटील यांनी विनापरवानगी प्रसाद माध्यमांसमोर विधाने केले या प्रकरणी शासन सेवेतून निलंबित करण्यात आले आहे याबाबत गृह विभागाने 18 जून रोजी आदेश काढले आहे राज्य शासनाचे निर्णय योजना याबाबत परिवहन आयुक्त यांची परवानगी न घेता थेट माध्यमातून विधाने करणे सीमा तपासणी नाक्या संदर्भातील शासनाचे निर्णय विरुद्ध तक्रारी करणे शासनविरुद्ध मत व्यक्त करणे तसेच परिवहन आयुक्तांकडून दिलेले कारणे दाखवा नोटीस बाबत खुलासा न करणे केल्याने संबंधित मोटार वाहन निरीक्षकावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे त्यांचे मुख्यालय उपप्रादेशिक परिवहन कार्यालय परभणी राहील. पूर्वपरवानगीशिवाय मुख्यालय सोडता येणार नाही निलंबन काळात कुठलेही गैरकर्ते केल्यास त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्यात येईल असे आदेश देण्यात आले.

# विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनासाठी छापील पास बंद

## 'चेहरा पडताळणी पद्धती'द्वारेच प्रवेश

**मुंबई :** येत्या सोमवारपासून (२२ जून) सुरू होणाऱ्या महाराष्ट्र विधानमंडळाच्या पावसाळी अधिवेशनासाठी विधान भवन प्रशासनाने सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या वेळी विधान भवनात प्रवेश करण्यासाठी वापरले जाणारे पारंपारिक छापील पासेस पूर्णपणे बंद करण्यात आले आहेत. त्याऐवजी पीठासीन अधिकाऱ्यांपासून ते मुख्यमंत्री, मंत्री, आमदार, अधिकारी, कर्मचारी, स्वीय सहायक आणि अभ्यागत अशा सर्वांनाच आता 'ई-प्रवेश प्रणाली'अंतर्गत "चेहरा पडताळणी पद्धती"द्वारेच प्रवेश दिला जाणार आहे, अशी माहिती महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातर्फे देण्यात आली.

विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे आणि विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत हा निर्णय घेण्यात आला असून, त्याची अत्यंत काटेकोर अंमलबजावणी केली जाईल. अधिवेशन काळात विधान भवन परिसरामध्ये होणारी अवाढव्य गर्दी नियंत्रित करणे आणि सुरक्षा यंत्रणेवरील तपासणीचा ताण कमी करून सुलभता आणणे, हा या सुविधेमागील मुख्य हेतू आहे. या नव्या डिजिटल प्रणालीबाबत मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री, सर्व मंत्री, राज्यमंत्री तसेच विधिमंडळ वार्ताकनासाठी येणारे इलेक्ट्रॉनिक आणि मुद्रित माध्यमांचे सर्व पत्रकार प्रतिनिधींना सूचित करण्यात आले आहे. याशिवाय आयएएस, आयपीएस आणि इतर सर्व शासकीय अधिकारी, कर्मचारी, सचिव, विशेष कार्य अधिकारी आणि सर्व आमदारांच्या स्वीय सहायकांनाही (पीए) या नव्या नियमाचे पालन करावे लागणार आहे. या सर्वांचा डेटाबेस आणि चेहऱ्याची पडताळणी करूनच त्यांना विधान भवनात प्रवेशाची परवानगी मिळणार आहे.

# हज हाऊसमध्ये वक्फ मंडळाचे कार्यालय हलविण्याच्या निर्णयाविरोधात कॉंग्रेसचे निवेदन

**छत्रपती संभाजीनगर :** हज हाऊसमध्ये महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे मुख्य कार्यालय तात्पुरत्या स्वरूपात स्थलांतरित करण्याच्या निर्णयाचा पुनर्विचार करून हज हाऊसची जागा हज कार्यासाठीच राखीव ठेवावी, अशी मागणी शहर जिल्हा कॉंग्रेस कमिटीने केली आहे. यासंदर्भात कॉंग्रेसच्या शिष्टमंडळाने विभागीय आयुक्त कार्यालयात निवेदन सादर केले. मागणीची दखल न घेतल्यास लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही कॉंग्रेसने दिला आहे. शहर जिल्हा कॉंग्रेसच्या निवेदनात म्हटले आहे की, हज हाऊस ही वास्तू हज यात्रेकरूंना सेवा, मार्गदर्शन, प्रशिक्षण तसेच हज प्रक्रियेशी संबंधित विविध प्रशासकीय सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी उभारण्यात आली आहे. राज्यभरातील हजारो हज यात्रेकरू दरवर्षी विविध कामांसाठी हज हाऊसला भेट देत असतात. आगामी हज प्रक्रियेच्या कालावधीत यात्रेकरू, प्रशिक्षक आणि नागरिकांची मोठ्या



प्रमाणात वर्दळ वाढणार असल्याने हज हाऊसमधील जागा इतर कार्यालयीन कामकाजासाठी वापरणे हे संस्थेच्या मूळ उद्देशाला बाधा आणणारे ठरू शकते, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळासाठी राज्यातील इतर पर्यायी जागांचा विचार करता येऊ शकतो. त्यामुळे हज यात्रेकरूंसाठी समर्पित असलेल्या हज हाऊसची निवड करण्याऐवजी शासनाने अन्य पर्यायी व्यवस्था उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी कॉंग्रेसने केली आहे. निवेदनात पुढे म्हटले आहे की, यापूर्वी काही कार्यालयांना हज हाऊसमध्ये तात्पुरत्या स्वरूपात जागा उपलब्ध करून देण्यात आली होती. मात्र अशा तात्पुरत्या व्यवस्थेचे कायमस्वरूपी स्वरूप निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे शासनाने याबाबत स्पष्ट धोरण आणि निश्चित कालमर्यादा जाहीर करावी. तसेच हज हाऊसच्या वापराबाबत कोणताही निर्णय घेण्यापूर्वी अल्पसंख्याक संस्था, सामाजिक संघटना, हज प्रशिक्षक, हज यात्रेकरू प्रतिनिधी आणि संबंधित घटकांशी चर्चा करून त्यांची मते जाणून घ्यावीत. हज हाऊस ही केवळ एक इमारत नसून महाराष्ट्रातील लाखो मुस्लिम नागरिकांच्या भावना, धार्मिक गरजा आणि हज व्यवस्थापनाशी निगडित असलेली महत्त्वाची संस्था आहे. त्यामुळे तिच्या मूळ उद्देशावर परिणाम करणारा कोणताही निर्णय व्यापक विचारविनिमयानंतरच घेण्यात यावा, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. यावेळी शहर जिल्हाध्यक्ष ॲड. सय्यद अक्रम यांनी सांगितले की, हज हाऊसच्या मूळ उद्देशाशी तडजोड करणारा कोणताही निर्णय स्वीकारला जाणार नाही. शासनाने तातडीने या निर्णयाचा पुनर्विचार करावा, अन्यथा कॉंग्रेसच्या वतीने लोकशाही मार्गाने मोठ्या प्रमाणावर आंदोलन करण्यात येईल. निवेदन सादर करताना जेष्ठ नेते इब्राहिम पठाण, युवक प्रदेश उपाध्यक्ष आमेर अब्दुल सलीम, इंजि. विशाल बन्सवाल, मोईन कुरेशी, आबेद हुसेन, शफीक शहा, मोहम्मद जाकेर, शेख कैसर बाबा, नदीम सौदागर, योगेश थोरात, साहेबराव बनकर, चंद्रकांत बनसोडे, मुनीर पटेल, प्रकाश पाटील, पुंडलिक चव्हाण, उत्तम दनके, इरफान पठाण, रामभाऊ लोखंडे यांच्यासह कॉंग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# आंतरवाली सराटीत आ.प्रसाद लाड–मनोज जरांगे पाटील यांची महत्त्वपूर्ण भेट

## मराठा आरक्षणाच्या अंमलबजावणीसह समाजाच्या विविध प्रश्नांवर चर्चा

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**आंतरवाली सराटी :** मराठा आरक्षणासह समाजाच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी भाजप आमदार प्रसाद लाड यांनी शुक्रवारी आंतरवाली सराटी येथे मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांची सदिच्छा भेट घेतली. राज्यातील मराठा समाजाच्या अपेक्षा, शासनाने घेतलेले निर्णय आणि त्यांच्या अंमलबजावणीची सद्यस्थिती यावर दोन्ही नेत्यांमध्ये सविस्तर चर्चा झाली.

मराठा समाजाच्या मागण्यांच्या पूर्ततेसाठी राज्य शासनाने वेळोवेळी घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी प्रत्यक्षात कितपत प्रभावीपणे होत आहे, विविध जिल्ह्यांतील युवकांना त्याचा लाभ मिळत आहे का, तसेच प्रशासन स्तरावर कोणत्या अडचणी निर्माण होत आहेत, याचा यावेळी आढावा घेण्यात आला. आरक्षणाशी संबंधित प्रक्रियेला अधिक गती मिळावी आणि पात्र लाभार्थ्यांपर्यंत शासनाच्या निर्णयांचा लाभ वेळेत पोहोचावा, यावर विशेष भर देण्यात आला.



यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाच्या प्रश्नांबाबत शासनाने दाखविलेल्या सकारात्मक भूमिकेची दखल घेतली. मात्र, जाहीर करण्यात आलेल्या निर्णयांची प्रभावी अंमलबजावणी होणे हीच समाजाची प्रमुख अपेक्षा असल्याचे त्यांनी नमूद केले. समाजातील युवक, विद्यार्थी आणि नोकरीच्या प्रतीक्षेत असलेल्या उमेदवारांच्या अपेक्षा शासनापर्यंत पोहोचविण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

आमदार प्रसाद लाड यांनी राज्य सरकार मराठा समाजाच्या प्रश्नांबाबत संवेदनशील असून आरक्षणासंदर्भातील शासन निर्णयांची काटेकोर अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक ती पावले उचलली जात असल्याचे सांगितले. आचारसंहिता संपल्यानंतर विविध प्रलंबित प्रक्रियांना अधिक गती दिली जाईल आणि समाजाच्या न्याय्य मागण्यांच्या पूर्ततेसाठी शासन कटिबद्ध राहील, असे त्यांनी स्पष्ट केले. मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर राज्यभर चर्चा सुरू असताना झालेल्या या भेटीकडे राजकीय व सामाजिक वर्तुळाचे विशेष लक्ष लागले होते. आंदोलनानंतरच्या घडामोडी, शासन निर्णयांची अंमलबजावणी आणि आगामी दिशा याबाबत या बैठकीत सकारात्मक संवाद झाल्याचे सांगण्यात येत आहे.

या प्रसंगी भाजपचे आमदार नारायण कुचे, भाजप शहर जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे, पक्षाचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# सं पा द की य

## विरोधकांना संपवण्याचे मनसुबे; ट्रेलरनंतर आता 'पिक्चर'ची प्रतीक्षा

महाराष्ट्राच्या राजकारणातील शह-काटशहाचा खेळ आता एका अत्यंत रंजक आणि तितक्याच गंभीर वळणावर येऊन पोहोचला आहे. शिवसेनेच्या वर्धापन दिनानिमित्त झालेल्या मेळाव्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विरोधकांना दिलेला थेट इशारा राज्याच्या राजकारणात आगामी काळात येणाऱ्या मोठ्या वादळाचे संकेत देत आहे. एका बाजूला पक्षाला लागलेली गळती रोखण्यासाठी विरोधकांचे प्रयत्न सुरू असतानाच, मुख्यमंत्र्यांनी "हा तर फक्त ट्रेलर होता, खरा पिक्चर अजून बाकी आहे," अशी दिलेली डरकाळी केवळ राजकीय वक्तव्य नक्कीच नाही. ६ खासदारांच्या बंडानंतर आता आमदार आणि नगरसेवकांनाही आपल्या बाजूला वळवून विरोधकांना पूर्णपणे खिळखिळे करण्याचे सत्ताधाऱ्यांचे मनसुबे यातून स्पष्टपणे दिसून येत आहेत. या संपूर्ण लढाईत आता 'वारसा' कोणाचा, हा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. "वारसा हा रक्ताने नाही, तर विचाराने ठरतो," असे म्हणत मुख्यमंत्र्यांनी थेट बाळासाहेबांच्या विचारांवर आपलाच अधिकार कसा खरा आहे, हे ठामपणे मांडले आहे. लोकशाहीत लोकप्रतिनिधींचे संख्याबळ आणि जनमानसातील पकड यावरच पक्षाचे अस्तित्व ठरत असते. एकापाठोपाठ एक मोठे मोहरे आपल्या बाजूला खेचत सत्ताधाऱ्यांनी संसदेपासून ते स्थानिक स्वराज्य संस्थांपर्यंत विरोधकांची कोंडी करण्याची रणनीती आखली आहे. सत्तेचा आणि संसाधनाचा पुरेपूर वापर करून समोरच्या गटाला आत्मपरीक्षण करायला लावणे, हा या राजकीय खेळीचा मुख्य भाग बनला आहे. दुसरीकडे, या सातत्याने होणाऱ्या फोडाफोडीच्या राजकारणामुळे विरोधकांमध्ये कमालीचे वैफल्य आणि अस्वस्थता पसरली आहे. आपले राजकीय भवितव्य सुरक्षित ठेवण्यासाठी आणि मतदारसंघातील विकासकामांचा निधी मिळवण्यासाठी अनेक लोकप्रतिनिधी सत्ताधाऱ्यांच्या गळाला लागत असल्याचे चित्र आहे. हा केवळ वैचारिक बदल नसून, पडद्यामागील रणनीती आणि राजकीय अस्तित्वाची लढाई आहे. मात्र, या सर्व गदारोळात मूळ विचारसरणी आणि पक्षाशी एकनिष्ठ राहिलेल्या सामान्य कार्यकर्त्याची अवस्था बिकट झाली आहे. नेत्यांच्या या उड्यांमुळे ग्रासरूटवरील कार्यकर्ता मात्र संभ्रमात पडला आहे. महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासात अनेक चढ-उतार आले, परंतु सध्या सुरू असलेला हा सत्तेचा संघर्ष अभूतपूर्व आहे. मुख्यमंत्र्यांनी जाहीरपणे 'पिक्चर अजून बाकी आहे' असे म्हटल्यामुळे आगामी काळात आणखी काही मोठे भूकंप राज्याला पाहायला मिळतील, यात शंका नाही. परंतु, या राजकीय सिनेमाचा शेवटचा अंक शेवटी जनतेच्याच हातात असतो. नेते बदलले, पक्ष फुटले तरी जनता आपला कौल कोणाला देते, यावरच अंतिम निकाल अवलंबून असणार आहे. सत्ताधाऱ्यांना तात्पुरते यश मिळत असले, तरी जनतेच्या मनातील जनमत जिंकणे हेच कोणत्याही राजकीय पक्षासमोरील खरे आणि अंतिम आव्हान असते.

## योग दिन विशेष : योगातून आरोग्य...आरोग्यातून आनंद !

आपण आपल्या परंपरा जाणून आहोत पण जगात आपली ओळख आपल्या विशिष्ट आणि अतिशय वेगळ्या संस्कृतीमुळे आहे. याला आज आपण भारतीय संस्कृती म्हणतो त्याची सुरूवात सिंधू संस्कृती पासून झाली आहे आणि याला 5 हजार वर्षाहून अधिक असा मोठा वारसा आहे. भारतातील आयुर्वेद तसेच योग ही जगाला ओळख आहे आणि आता जागतिक स्तरावर योगाचं महत्व मान्य झाल्यावर दरवर्षी 21 जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिवस म्हणून साजरा होत आहे.

योग दिवस हा 21 जून रोजी साजरा करण्याचं कारण म्हणजे हा जगाच्या उत्तर गोलार्धात असणारा सर्वात मोठा दिवस. याचं या भागातील देशांमध्ये वेगळं महत्व मानलं जातं. 14 जानेवारी रोजी दरवर्षी सूर्य मकरवृत्त या मानीव रेषेवर येतो आणि तिथून दिवसाचा कालावधी वाढण्यास सुरूवात होते. याचा शेवटचा आणि सर्वाधिक काळ दिवसाचा आणि सर्वात लहान काळ रात्रीचा असा असणारा दिवस म्हणून या दिवशी योग दिवस साजरा करावा असा प्रस्ताव प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सप्टेंबर-2014 मध्ये संयुक्त राष्ट्र सभेत बोलताना आपल्या भाषणात मांडला होता. ज्याला जगभरातील 177 देशांनी पाठिंबा दिला आणि प्रस्ताव मंजूर होऊन योग दिवस हा आंतरराष्ट्रीय योग दिवस झाला आणि तो जगभरात साजरा होतो.

योगाचा संबंध आपल्या आरोग्याशी असल्याने योगाचे महत्व जाणून जगभरात 21 जून 2015 रोजी पहिला आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा झाला. याला जगभरात एकाचा वेळी लाखो जणांचा प्रतिसाद लाभला.

योग अर्थात योगासने यात सूर्यनमस्कार महत्वाचा मानला जातो मात्र केवळ सूर्यनमस्कार म्हणजे योग नाही. योग करताना विविध आसने केली जातात आणि प्रत्येक आसनाचा शरिराच्या विविध अंगांच्या व्यवस्थितपणा आणि तंदुरूस्तीत फायदा होतो. हे वैज्ञानिकदृष्ट्या सिद्ध झालेले असल्याने त्याचा फायदा आरोग्य राखण्यासाठी घेणाऱ्यांची संख्या देशातच नव्हे तर जगात वाढताना दिसत आहे.

काही गोष्टीत भारतीयांची मानसिकता अगदी वेगळी आहे. "पिकतं तिथं विकत नाही" अशा उक्तीप्रमाणे आपल्याच देशाची संस्कृती आपण दुर्लक्षित करतो आणि "फॉरीन रिटर्न" म्हणून तीच बाब समोर येते त्यावेळी आपण त्याचं कौतूक करतो असं दिसतं.

योगामध्ये 'ध्यान' करण्याचं वेगळं महत्व आहे. ध्यान करण्यातून मानसिक आरोग्याला बळकटी मिळते हा भारतीय 'योग परंपरेचा' एक भाग आहे. परंतु तो काळाच्या ओघात जवळपास विस्मरणात गेला. बौद्ध धर्म आपल्या देशात सुरू झाला यात 'ध्यान' करण्याला विशेष महत्व आहे. ती साधना मानली जाते. बौद्ध धर्माचा प्रचार भारतापेक्षा पूर्व आशिया खंडात अधिक झाला. सोबतच चीनमध्ये देखील हा धर्म स्थिरावला. बौद्ध धर्म जपान देशात वाढला त्यावेळी 'ध्यान' परंपरेला अधिक महत्व तेथे देण्यात आले आणि भारतातील 'ध्यान' प्रथम चीनमध्ये 'चान' आणि जपानी भाषेत 'झेन' झाले.

'ध्यान' झेन शब्दासह भारतात दाखल झाल्यावर इथं सर्वांना पुन्हा नव्याने त्याचे महत्व कळलं आणि




भारतात पुन्हा योग आणि ध्यान याकडे सर्वांनी गांभिर्यानं बघायला सुरूवात केली.

आपली सध्याची जीवनशैली तंत्रयुक्त आणि गतिमान झाली आहे. या धकाधकीमुळे ताण-तणाव वाढून आजाराचे प्रमाण वाढले आहे. यातून सुटका शक्य नाही, परंतु आचा दुष्परिणाम आरोग्यावर होणार नाही इतकी शारिरीक आणि मानसिक क्षमता बांधणी करण्याची ताकद योगात आहे. म्हणून योग महत्वाचा आणि ध्यान देखील.

ध्यानामुळे आपण अंतर्मनाचा वेध घेऊन एकाग्रता आणि मनःशांती वाढवू शकतो. आयुष्यात संकट आणि तणावाच्या काळात याचा अधिक लाभ होतो. ध्यान केल्याने मनःशांती तर मिळते सोबत मानसिक संतुलनात कमालीची वाढ होते. संकटकाळी निर्णय घेताना मनाचे संतुलन आणि स्थिरता यामुळे निर्णयक्षमता वाढते. याचा सर्वात मोठा फायदा मानसिक आरोग्याला होत असल्याने याला देखील आज अधिक महत्व आले आहे.

शारिरीक आरोग्याचा विचार करता आज वैद्यक शास्त्रात झालेली क्रांती आणि विकसित होणारे नवनवीन तंत्र यामुळे आजारांचे निदान झटपट होते. उपचार आणि औषधी असल्याने माणसाचं सरासरी आयुष्यमान वाढलं आहे. देशाला स्वातंत्र्य मिळालं त्यावेळी भारतातील सरासरी आयुर्मान केवळ 32 वर्षे इतकच होतं, आता यात 20 ते 25 वर्षे इतकी वाढ झाली आहे.

आयुर्मान वाढलं आणि ते आणखी वाढत जाणार हे मान्य करताना या वाढलेल्या आयुष्यात शरीर तंदुरूस्त राखण्याचं आव्हान आता 40-50 वर्षाच्या पुढे सरकलेल्या पिढी समोर आहे. अवयव तंदुरूस्त राखणं हे औषधांनी होणारं काम नाही तर त्यासाठी व्यायाम महत्वाचा असतो आणि यातील सर्वोत्तम व्यायाम अर्थात योगासने होय म्हणून योग दिन महत्वाचा.

बैठे काम करणारे नव्हे तर अधिकाधिक यंग आणि वाहनाचा वापर करणाऱ्यांमध्ये मधुमेहासारख्या समस्या वाढत आहे. आहार आणि जीवनशैली सोबत योग हे शरीर तंदुरूस्त ठेवण्यासाठी आवश्यक आहे. शरिराच्या तंदुरूस्तीचा विचार करताना प्रत्येक अवयव महत्वाचा आहे. यासाठी विविध प्रकारची आसने आहेत याचे प्रकार आणि लाभ देखील जाणून घेतले पाहिजेत.

1) बसून करावयाची आसने

अ) पद्मासन - ध्यान आणि एकाग्रतेसाठी उत्तम.

ब) वज्रासन - जेवणानंतर पचनशक्ती सुधारण्याकरीता.

क) अर्धमत्सेन्द्रासन - पाठीचा कणा आणि पोटाच्या स्नायूंना सक्षम व निरोगी ठेवण्यासाठी.

2) पाठीवर झोपून करायची आसने

अ) सर्वांगासन - रक्ताभिसरण सुधार आणि थायरॉईड ग्रंथीसाठी लाभदायक

ब) हलासन- पाठीची लवचिकता वाढवणे आणि पोटावरील चरबी कमी करण्यासाठी

क) सेतूबंधासन - पाठ व कंबरदुखी कमी करण्यासाठी

3) पोटावर झोपून करायची आसने

अ) भुजंगासन- फुफ्फुसांची क्षमता वाढवण्यासह पाठदुखीसाठी

ब ) शलभासन- पाठीचा कणा मजबूत करण्यासाठी

क) धनुरासन- पचनक्रिया वृध्दी आणि एककूणच शाररिक सुडौलतेमध्ये वृध्दीसाठी

4) उभे राहून करावयाची आसने

अ) वृक्षासन- शरीराचा समतोलपणा राखणे व मनःशांती

ब) ताडासन- उंची वाढविणे व स्नायू बळकटीसाठी

क) त्रिकंणासन- कंबर, मांडी आणि खाद्यांची लवचिकता वाढवण्यासाठी

आपण साधारणपणे सोप्या आसनांनी सुरूवात करून आरोगयाचा मार्ग व्यवस्थित राखू शकतो. योग करा आणि निरोगी रहा. किंवा योगातून आरोग्य आणि आरोग्यातून आनंद जगणं कितीही धकाधकीचं असू दया एक गोष्ट महत्वाची "जान है तो जहाँ है"

योग करा, योगाचा मार्ग आरोग्याचा मार्ग बाकी सांगणं काहीच नाही. योगदिन आहे एक दिवस साजरा न करता त्याला आयुष्याचा भाग बनवा आणि आनंदी रहा.

**प्रशांत दैठणकर**
**982319946**

## विशेष लेखः- मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरिक्षण

मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षण मोहिमेस शनिवार दि.२० जून पासुन सुरुवात होणार आहे. गणना अर्जाची छपाई व कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण आटोपल्यावर येत्या ३० जून पासून मतदान केंद्रस्तरीय कर्मचारी घरोघरी जाऊन मतदारांची माहिती पुर्वीच्या नोंदीशी जुळवणी केली जाईल. प्रारुप मतदार याद्या दि.५ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहेत. ही प्रक्रिया मतदार याद्या अधिक निर्दोष करण्यासाठी राबविली जात आहे. लोकशाही बळकट करणाऱ्या निवडणूक प्रक्रिया अधिक पारदर्शक करण्यासाठी व मतदारांच्या मताच्या हक्काचे संरक्षण होण्यासाठी पुनरिक्षण आवश्यक आहे. जाणून घेऊ या पुनरिक्षण प्रक्रियेविषयी-

विशेष सखोल पुनरिक्षणाचा इतिहास

भारत निवडणूक आयोगामार्फत संपूर्ण देशात मतदार याद्यांचे सखोल पुनरिक्षण करण्यात येत आहे.याबाबत दि.२४ जून २०२५ रोजी आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. यापूर्वी देशात सन १९५२-५६, १९५७, १९६१, १९६५-१९६६, १९८३-८४, १९८७-८८, १९९२, १९९५, २००२-२००४ या वर्षी विशेष सखोल पुनरिक्षण घेण्यात आले आहे.

१६ राज्यांत मोहीम

या मोहिमेचा तिसरा टप्पा १६ राज्ये आणि ३ केंद्रशासित प्रदेशात राबविण्यात येत आहे. संविधानाच्या कलम ३२६ प्रमाणे मतदार यादीत मतदाराचे नाव समाविष्ट करण्यासाठी संबंधित व्यक्ती ही भारताचा नागरिक असणे आणि वयाची १८ वर्षे पुर्ण असणे आवश्यक आहे.

पुनरिक्षण मोहिमेचे वेळापत्रक

दि.२० ते २९ जून दरम्यान गणना अर्जाची छपाई व बीएलओ यांचे प्रशिक्षण, दि.३० जून ते २९ जुलै दरम्यान बीएलओ घरोघरी जाऊन गणना अर्ज वाटप करुन ते भरुन अर्ज परत घेतील. दि.५ ऑगस्ट रोजी प्रारुप मतदार याद्यांची प्रसिद्धी, दि.५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर प्रारुप यादीवर दावे व हरकती नोंदविणे, ३ ऑक्टोंबर पर्यंत दावे व हरकती निकाली काढणे, दि.७ ऑक्टोंबर रोजी अंतिम मतदार याद्यांची प्रसिद्धी.

काय होणार पुनरिक्षण प्रक्रियेत?

दि.३० जून ते २९ जुलै या कालावधीत मतदान केंद्रस्तरीय कर्मचारी हे मतदारांच्या घरोघरी जाऊन गणना अर्ज वाटप करतील. त्यात मतदारांची मतदार यादीतील सध्याची माहिती आधीच भरलेली असेल. तसेच सन २००२-२००४ मध्ये झालेल्या सखोल पुनरिक्षणातील माहिती (आई वडील/ आजी आजोबा यांची) भरलेली असेल किंवा मतदार स्वतः ही भरु शकेल. तसेच मतदारांना आपले नवीन छायाचित्रही उपलब्ध करुन देता येईल. सद्यस्थितीत या जुन्या नोंदीची जुळवणी सद्याच्या मतदारांशी केली जाईल. ही कारवाई मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांकडून करण्यात आली आहे. घरोघरी गेल्यावर गणना प्रपत्रात जुनी माहिती भरणे सहज शक्य व्हावे म्हणून ही पुर्वतयार करण्यात आली आहे. आता पर्यंत ७६.६० टक्के ही प्रक्रिया (मॅपिंग) पूर्ण झाली आहे.

ऑनलाईन पर्यायही उपलब्ध

आपल्या आई-वडील/ आजी आजोबा यांच्या सन २००२-०४ या कालावधीतील नोंदीची माहिती भारत निवडणूक आयोगाच्या https://voters.eci.gov.in या संकेतस्थळावर सहज उपलब्ध होईल. त्यासाठी केवळ मतदाराने आपले राज्य, जिल्हा, विधानसभा मतदार संघ व संपुर्ण नाव इतकी प्राथमिक माहिती भरली तरी जुन्या नोंदी सहज उपलब्ध होतील. ही मतदाराने आपल्याकडे जतन करुन ठेवावी व आपल्या घरी आलेल्या गणना कर्मचाऱ्याला उपलब्ध करुन द्यावी. घरोघरी भेटी दरम्यान मतदान केंद्रस्तरीय अधिकारी आपल्या घरी किमान ३ वेळा येईल व भेट दिल्याची नोंद ठेवेल.पुन्हा गणना पत्र गोळा करण्यासाठी हे अधिकारी भेट देतील. याशिवाय मतदार हे गणना पत्र ऑनलाईनही भरु शकतील.

प्रारुप मतदार याद्यांची प्रसिद्धी

प्रारुप मतदार यादी दि.५ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध होईल. ज्या मतदारांची नावे पुर्वीच्या यादीशी जुळवणी झाले नसतील वा त्यात काही त्रुटी असतील अशा व्यक्तिंना नोटीस पाठवून कळविले जाईल. तसेच या याद्या नावे समाविष्ट न झाल्याच्या कारणासह संबंधित मतदार संघातील स्थानिक स्वराज्य संस्था कार्यालये, तहसिल कार्यालय, जिल्हा निवडणूक अधिकारी, मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या संकेतस्थळावर इ. ठिकाणी प्रसिद्ध करणात येतील. त्यावर हरकतीही नागरिकांना घेता येतील अशी तरतूद आहे.

राजकीय पक्षांचाही सहभाग

या प्रक्रियेत राजकीय पक्षांनाही सहभागी केले जाणार असून त्यांनीही आपले मतदान केंद्र प्रतिनिधी नेमावे, जेणे करुन ही प्रक्रिया अधिक पारदर्शक व अचूक होण्यास मदत होईल.

जिल्ह्याची सद्यस्थिती

जिल्ह्यात एकूण मतदार ३२ लाख १७ हजार २३६ इतके असून आतापर्यंत २४ लाख ६४ हजार ५३१ मतदारांचे मॅपिंग पूर्ण झाले आहे. या गणनेसाठी ३२६४ मतदान केंद्रस्तरीय अधिकारी नियुक्त करण्यात आले आहे. त्यांच्या कामावर लक्ष ठेवण्यासाठी ३२७ सुपरवायझर नेमण्यात आले आहेत. याशिवाय ९ ईआरओ, ३३ एईआरओ नियुक्त करण्यात आले आहे.

मतदारांसाठी माहितीची उपलब्धता : प्रत्येक सहायक निवडणूक अधिकारी, जिल्हा निवडणूक अधिकारी येथे मदत कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. या शिवाय १९५० या हेल्पलाईन क्रमांकावरही नागरिकांना माहिती उपलब्ध होईल. या शिवाय 'बुक अ कॉल', ही सुविधाही ECI-NET या मोबाईल ॲपवर उपलब्ध असेल.

**-माहिती संकलनः जिल्हा माहिती कार्यालय, छत्रपती संभाजीनगर**

## अभाविपच्या साखळी उपोषणाला यश; अवघ्या तीन तासांत विद्यापीठाने जाहीर केले परीक्षा वेळापत्रक




**हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी**

**छत्रपती संभाजीनगर** : अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांच्या उन्हाळी सत्र परीक्षांचे वेळापत्रक जाहीर करण्याच्या मागणीसाठी अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (अभाविप) छत्रपती संभाजीनगर महानगर शाखेने केलेल्या साखळी उपोषणाला यश मिळाले आहे. उपोषण सुरू झाल्यानंतर अवघ्या तीन तासांत डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाने दोन्ही अभ्यासक्रमांचे परीक्षा वेळापत्रक जाहीर केले.

उन्हाळी सत्र संपत आले असतानाही अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे वेळापत्रक जाहीर झाले नव्हते. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले होते. या पार्श्वभूमीवर अभाविपच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाच्या प्रादेशिक कार्यालयात साखळी उपोषण सुरू करण्यात आले. "परीक्षांचे वेळापत्रक तात्काळ जाहीर करण्यात यावे" अशी मागणी यावेळी करण्यात आली.

अभाविपच्या आंदोलनाची दखल घेत विद्यापीठ प्रशासनाने तातडीने कार्यवाही करत अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र या दोन्ही अभ्यासक्रमांचे उन्हाळी सत्र परीक्षा वेळापत्रक प्रसिद्ध केले. वेळापत्रक जाहीर होताच आंदोलनकर्त्यांनी समाधान व्यक्त केले. या साखळी उपोषणात सुकन्या बावस्कर, श्रीया महाजन, श्रावणी साबळे, रोहित पवार, शुभम भोसले आणि ओम पवार यांनी सहभाग घेतला. वेळापत्रक जाहीर झाल्यानंतर प्रादेशिक संचालक प्रा. डॉ. ब्रिजेश अय्यर यांच्या हस्ते फलाहार घेऊन आंदोलन मागे घेण्यात आले.

यावेळी अभाविपच्या राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य सुकन्या बावस्कर म्हणाल्या, "उत्तम शिक्षण आणि वेळेवर परीक्षा हे विद्यार्थ्यांचे मूलभूत हक्क आहेत. विद्यार्थी हिताच्या प्रश्नांवर अभाविप नेहमीच आग्रही राहिली आहे. भविष्यातही डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठातील विद्यार्थ्यांच्या अडचणी आणि मागण्यांसाठी अभाविप सातत्याने पाठपुरावा करणार आहे." विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हितासाठी केलेल्या या आंदोलनामुळे परीक्षा वेळापत्रकाचा प्रश्न तातडीने निकाली निघाल्याने विद्यार्थ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## विश्व... तुमचं.. आणि आभासी युग !

आपण तंत्रज्ञानाने विकासाचा नवा टप्पा गाठतोय ही अतिशय समाधानाची नव्हे तर आनंदाची बाब आहे. मात्र या साऱ्या प्रगतीमध्ये मोठ्या प्रमाणावर तोटा देखील आहे. जसे नाण्याला दोन बाजू असतात तसच याबाबतीत देखील आहे. आलेला कृत्रिम बुद्धीमता आणि इतर समाज माध्यमांनी नवा बदल आणला आहे. समाज माध्यमे जशी प्रगत झाली तसे त्याचे धोके देखील आता दिसत आहेत. यात सर्वात मोठा धोका हा मानसिक आरोग्याला आहे.

आरोग्याचा आपण विचार करतो त्यावेळी आपणास शारिरीक आरोग्या सोबतच मानसिक आरोग्याचा देखील विचार करणे आवश्यक असते आणि नेमकेपणाने आपणास याचा विसर पडलेला दिसतो.

घरात चार जणांचे कुटुंब ही शहरीकरणातून नव्याने आलेली समस्या आहे. त्यातही काही कुटुंबात ३ जणच आहेत. अशीही स्थिती आहे. पूर्वीच्या काळी संयुक्त कुटुंब पद्धती होती. त्यावेळी घरातला काळ हा संवादाचा काळ होता. त्यावेळी रेडिओ शिवाय मनोरंजनाचे दुसरे साधन नव्हते. नंतर टिव्हीचा शिरकाव झाला मग २४ तास वाहिन्यांनी मनोरंजनाचा रतिब सुरु केला. आज देशातील विविध भाषक टीव्ही वाहिन्यांची संख्या ११७१ इतकी आहे.

मनोरंजनासाठी वाहिन्या कमी पडताहेत आणि आपण तयार केलेल्या कलाकृतींना व्यासपीठ मिळत नाही. या भुमिकेतून ओव्हर द टॉप अर्थात OTT चा प्रसार वेगात झाला.

हे सर्व घडत असताना इंटरनेटचा प्रसार वाढला. ज्याला माहिती तंत्रज्ञानाचे युग आपण म्हणतो तसं युग अवतरले. यात फेसबूक, एक्स तसेच इन्ट्राग्राम सारख्या संवाद माध्यमांसोबत दुहेरी संवाद, चित्र संवाद आणि संदेश वहन सुरु झाल. यात 'व्हॉटसअप' ने प्रत्येक हातातला मोबाईलने मानसिक शांततेला पहिला धक्का दिला.

'व्हॉटसअप' हातोहाती पोहचलं, त्यासोबत त्याचा दुरुपयोग मोठ्या प्रमाणावर दिसायला लागला. नवी पिढी अर्थात जेन-झी (Gen-z ) ने याला झटपट स्विकारलं असलं तरी जुनी पिढी कुठेतरी




अडखळताना दिसत होती.

यानंतर आलेल्या 'रिल्स' ने एक क्रांती घडवली व सोबत नव्या पिढीची मानसिक शांतता पूर्णपणे संपवली. त्यातच जुन्या पिढीला आता या रिल्सचं 'व्यसन' जडलय की काय असं आता वाटायला लागले आहे. एका घरातील ४ माणसं ४ मोबाईल आणि ४ स्वतंत्र विश्व एकाच छताखाली अशी स्थिती आली आहे.

या रिल्सच्या प्रभावाने मोठ्या प्रमाणावर नवी पिढी दोन प्रकारे स्वतःचं नुकसान करून घेताना दिसते. 'रिल्स' च्या नादात होणारे अपघाती मृत्यू हा स्वतंत्र असा विषय आहे. मात्र आपल्या उपस्थितीची दखल घेणं आपल्या कामाला दाद मिळणं या अपेक्षा वाढलेला नव्या पिढीत नैराश्य वाढत आहे आणि ही धोक्याची घंटा आहे.

हातात मोबाईल घेऊन रस्ता ओलांडणारे अनेक जण दुर्दैवाने अपघाती मृत्यूत प्राण गमावून बसले आहेत. या माध्यमाच्या वेडापायी स्वतःची तहान-भूक हरपून झोपही विसरणारे नकळत स्वतःच्या आरोग्यावर परिणाम करून घेत आहेत

२०१३ साली मी या विषयावर प्रथम लिहिलं, त्यावेळी म्हंटल होत की, आठवड्यातून किमान एक 'मोबाईल हॉलीडे ' सर्वांनी पाळावा. आता तर स्थिती अशी आली आहे की 'गॅझेट फ्री' अवर्स (तास) दिवसात किती असावेत हे ठरवावं लागणार आहे. टीव्ही, मोबाईत हे सारं मिळून आपला 'स्क्रीन टाईम' किती मर्यादीत ठेवायचा याचा निर्णय घ्यावा लागणार आहे.

मोबाईल हे संदेशवहन आणि केवळ संदेशवहन इतके मर्यादीत राहिलेलं नाही. मात्र आजही अमेरिकेसारख्या महासत्ता असणाऱ्या देशात 'पेजर' चा वापर अधिक केला जातो हे देखील आपण जाणून घेतलं पाहिजे. "मोबाईल माझ्यासाठी कि मी मोबाईलसाठी" हे ठरवावं लागणार आहे.

मोबाईलमधील कॉन्टेन्ट बघताना आपल्या मानसिक स्थितीत नेमकेपणाने काय बदल होतात याचा विचार होत नाही. 'न्यूरोसायन्स' च्या अभ्यासातून समोर आलं आहे की, आपल्या मेंदूत कृत्रिम लहरीतून आनंदाची अनुभूती देणारे 'डोपामाइन' असेल तर आपल्याला त्यात अधिक रस असतो, पण कृत्रिम डोपामाईन निर्मिती ही क्षणिक असते. काही झालं तरी ते पूर्णपणे आभासी विश्व आहे.

घरात कुटुंबासोबत होणारा अंवाद, मित्र-मैत्रीणीसोबत चर्चा करणे तसेच, प्रसंगी वाद-विवाद, आपल्या आसपासच्या निसर्गाचं आणि खऱ्या जगाचं भानं असणं म्हणजे खरा आनंद आहे. 'रिल्स' बघताना सोशल मीडिया साईटस् नकळत आपल्या आवडीचा वेध घेऊन त्याच पद्धतीच्या रिल्स सातत्याने आपणास दिसतील असे 'अल्गोरिदम' विकसित करून आपल्या मनाचा नकळत ताबा घेत आहे.

वय झाल म्हणून सांगत नाही पण रेडिओवर पुढचं गाणं कोणतं असेल याची अनिश्चितता आणि अपेक्षा व त्यातील आनंद वेगळा होता. १५ पैशांचं ख्यालीखुशाली कळवणारं "टपाल" पोस्टकार्ड जितका आनंद देत असे तितका आनंद या आभासी जगात निश्चित नाही.

या स्वागत आहे खऱ्या विश्वात... सोडा ते आभासी विश्व...!

**प्रशांत दैठणकर**
**982319946**

दैनिक
# हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



## खुलताबाद पोलिसांच्या तत्परतेमुळे 'येसगाव'मध्ये मोठा अनर्थ टळला; दोन नागरिक किरकोळ जखमी



हिंदू प्रकाशवार्ता । प्रतिनिधी

खुलताबाद : तालुक्यातील येसगाव येथील गिरजा मध्यम प्रकल्पावर मासेमारी हक्कावरून दोन गट आमनेसामने आल्याने निर्माण झालेली तणावाची परिस्थिती खुलताबाद पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन यांनी पोलिसांच्या तगड्या फोज फाट्यासह घटनास्थळावर दाखल होऊन अत्यंत हुशारीने आणि तत्परतेने हाताळली.पोलिसांच्या वेळीच हस्तक्षेपामुळे धरण परिसरातील एक मोठा अनर्थ टळला.

## चाऱ्या व पाण्या अभावी मेंढपाळांची भर उन्हात वेरूळ घाटात लहान मुलांसह 'तारेवरची कसरत'



हिंदू प्रकाशवार्ता । प्रतिनिधी

**खुलताबाद प्रतिनिधी :** खुलताबाद आज जून महिना दि १९ रोजी दुपारी भर उन्हामध्ये मेंढपाळाची चारा व पाण्यासाठी भटकती सुरू आहे पावसाने दडी मारल्यामुळे ग्रामीण भागात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. याचा सर्वाधिक फटका गोरगरीब मेंढपाळ करणाऱ्यांना बसत असून, जनावरांच्या चाऱ्याचा आणि पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. खुलताबाद आणि परिसरात जंगलात कुठेही चारा उपलब्ध नसल्याने, आपल्या पोटाची खळगी भरण्यासाठी आणि मुक्या जनावरांना जगवण्यासाठी मेंढपाळांना भर उन्हात एका गावातून दुसऱ्या गावी स्थलांतर करण्याशिवाय दुसरा पर्याय नसल्याची प्रतिक्रिया मेंढपाळ यांनी दिली.

## 'नशामुक्त भारत अभियान विकसित भारत की पहचान' सप्ताहास सुरू

छत्रपती संभाजीनगर : केंद्र सरकार व राज्य सरकारचा सामाजिक न्याय विभाग, नशाबंदी मंडळ, मानव अधिकार समिती, वंदे मातरम शाळा यांच्या संयुक्त विद्यमाने 'नशामुक्त भारत अभियान विकसित भारत की पहचान' या टॅग लाईननुसार सप्ताहाचे उद्घाटन पुंडलिक नगरमध्ये वंदे मातरम शाळा येथे मोठ्या उत्साहात करण्यात आले.

या निमित्ताने अंमली पदार्थ विरोधीविषयक पोस्टर प्रदर्शन, महामानवांच्या विचार पुस्तिका वाटप, व्यसन विषयक पत्रके वाटप, व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. व्यसनी पदार्थ कसे ओळखावे व शाळेतील विद्यार्थ्यांना चॉकलेटच्या नावाखाली जे स्ट्रॉबेरी चॉकलेट वाटप चालू आहे, ते खात्री करूनच घेण्याविषयी आवाहन करण्यात आले. व्यसनमुक्तवरील दुष्परिणाम त्यावरील उपाय प्रबोधनाद्वारे शेख रशीद, प्रकाश मोरे आणि भाऊ पठाडे यांनी प्रभावीपणे मांडले. अंमली पदार्थ, व्यसनविषयक वनस्पतीजन्य पदार्थ, निकोटिनयुक्त सिगारेट, विडी पदार्थ व अल्कोहोलयुक्त दारू पदार्थांपासून सुटका करून घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी पालकांसाठी कसे प्रयत्न करावे, जेणेकरून पालक व्यसनांपासून मुक्त होतील हे सप्रयोग दाखवण्यात आले. कुतूहल म्हणून सुद्धा कुठल्याही नशेचा प्रथम प्रारंभ विद्यार्थ्यांनी करू नये, कारण कुतूहल म्हणून घेतलेला नशिला पदार्थाच शेवटी जीवनाचा सर्वनाश करतो. सूत्रसंचालन नितीन खोडके यांनी, तर आभार मुख्याध्यापिका उगले यांनी मानले.

## हिंदू सुरक्षा सेवा संघाच्या प्रदेशाध्यक्षपदी संदीप वाकडे

### हिंगोलीच्या संघर्षमय वाटचालीला प्रदेश नेतृत्वाची संधी

**हिंगोली :** हिंदू सुरक्षा सेवा संघाच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदी हिंगोली येथील निष्ठावान कार्यकर्ते संदीप वाकडे यांची निवड करण्यात आली आहे. संघाच्या केंद्रीय समितीने गुरुवारी याबाबतची अधिकृत घोषणा केली.



संदीप वाकडे यांनी मागील 15-16 वर्षांपासून भारतीय जनता पार्टीमध्ये विविध जबाबदाऱ्या समर्थपणे सांभाळल्या आहेत. युवा मोर्चा शहराध्यक्ष, युवा मोर्चा सरचिटणीस, युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष, शहराध्यक्ष हिंगोली अशी महत्त्वाची पदे त्यांनी भूषविली आहेत.

लहानपणापासूनच राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, बजरंग दल,या संघटनांमध्ये त्यांनी सक्रिय कार्य केले आहे. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेत कार्यकर्ता ते महाविद्यालय प्रमुख व जिल्हा संयोजक पदापर्यंत त्यांनी जबाबदारी पार पाडली आहे. सध्या ते हिंदू सुरक्षा सेवा संघाचे हिंगोली जिल्हाध्यक्ष तथा महाराष्ट्र प्रदेश महामंत्री म्हणून कार्यरत होते.

*संघर्षातून घडलेले नेतृत्व*

संदीप वाकडे यांचा जीवनप्रवास अत्यंत प्रेरणादायी आहे. वयाच्या 5व्या वर्षापासून त्यांनी हलाखीचे जीवन अनुभवले, हॉटेलमध्ये काम, बस स्टॉपवर वर्तमानपत्र विक्री, गल्लोगल्ली ब्रेड विक्री असे कष्ट करून त्यांनी शिक्षण पूर्ण केले. प्रतिकूल परिस्थितीतही ते शाळेत नेहमी पुढे असत आणि सार्वजनिक कार्यात अग्रेसर राहिले.

*सामाजिक योगदान*

शिक्षणाच्या बाजारीकरणाविरोधात त्यांनी मंत्रालयावर मोर्चा काढून लक्ष वेधले होते. दुर्गादेवी मंडळ, गणपती मंडळ यांसारख्या धार्मिक मंडळांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे. हिंगोली येथे त्यांनी _मा. तुलसी नवदुर्गा महोत्सव समिती_ ची स्थापना केली आहे.

विद्यार्थी चळवळ, युवा संघटन, पक्ष बांधणी आणि धार्मिक कार्य अशा सर्व आघाड्यांवर त्यांना 16 वर्षांचा दांडगा अनुभव आहे. अत्यंत गरिबीतून येऊन निष्ठेने पक्ष व धर्मकार्य करणाऱ्या संदीप वाकडे यांना प्रदेशाध्यक्षपदाची जबाबदारी मिळाल्याने हिंगोलीसह संपूर्ण मराठवाड्यातील कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

हिंदू सुरक्षा सेवा संघ, हिंगोली जिल्हा यांच्यावतीने या निवडीचे स्वागत करण्यात आले असून, संदीप वाकडे यांच्या नेतृत्वाखाली संघटन अधिक मजबूत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

# रेल्वे स्टेशन परिसरातील भंगारच्या गोडाऊनला भीषण आग गंगाखेड

## सुदैवाने जीवितहानी नाही, लाखो रुपयांचे साहित्य जळून खाक

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी :** रेल्वे स्थानक परिसरात असलेले दिनांक 19 जून रोजी शुक्रवार दहा वाजेच्या सुमारास लागलेल्या आगीत गोडाऊन सह शेजारी असलेल्या घरातील लाखो रुपयांचे साहित्य जळून खाक झाले आहे सुदैवाने यात कोणतीही जीवित हानी झाली नाही.

सविस्तर माहिती अशी की गंगाखेड रेल्वे स्थानक परिसरात शासकीय गोडाऊन जवळ असलेले सोहेल अहमद अब्दुल कदिर कुरेशी यांच्या भंगार च्या गोडाऊनला शुक्रवार रोजी सकाळी दहा वाजेच्या सुमारास अचानक आग लागली यात प्लास्टिक भंगार साहित्याला लागलेल्या आगीने पाहता पाहता रोज रोज धारण करत स्टील स्टील मटेरियल प्लास्टिक मटेरियल ठिबक सिंचन साहित्य बिसलेरी बॉटल व तीन शेड अंदाजित रक्कम दहा लाखापेक्षा जास्त चे साहित्य जळून खाक होऊन नुकसान झाले गोडाऊन शेजारी असलेले राजाभाऊ गुंडप



यांच्या घराला आगीने विळखा घातल्याने या आगीत एक दुचाकी एक सायकल घरात ठेवलेले रोख रक्कम गादी पलंग असे लाखो रुपयांचे साहित्य जळून खाक झाले आहे आगीची घटना घडतात परिसरातील नागरिक व नगरसेवक शेख साबिर सुनील चौधरी सय्यद सलीम अब्दुल रहमान कुरेशी सय्यद झहीर इरफान खान सय्यद सलीम शेख अखिल रहमतुल्ला सय्यद दिलावर गोपाळ चौधरी सय्यद अलीयोदिन अजमत पठाण दीपक पारवे अजमत खान आदींनी घटनास्थळी धाव घेत खाजगी पाण्याचे टँकर तसेच गंगाखेड नगरपरिषद व जी सेवन शुगरचे तसेच पालम नगरपंचायतचे अग्निशामक दल प्राचारण करून प्रचंड प्रमाणात लागलेल्या आगीचे लोट उठलेले आग विझवण्यासाठी शर्तीचे प्रयत्न सुरू केले तब्बल दोन तास आथक परिश्रम करून हे आग नियंत्रणात आली नसल्याने संपूर्ण गोडाऊन तसेच शेजारी असलेले एक घर जळून खाक झाले आहे

## 'शेतकरी देवो भव' भावनेतून तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवा : कुलगुरु

**छत्रपती संभाजीनगर :** 'शेतकरी देवो भव' भावनेतून संशोधन आणि तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याचे आवाहन कुलगुरू प्रा.डॉ.इंद्र मणि यांनी येथे केले. वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाची ७९ वी खरीप विभागीय संशोधन व विस्तार सल्लागार समितीची बैठक राष्ट्रीय कृषी संशोधन प्रकल्प येथे गुरुवारी, १८ जून रोजी ऑनलाइन पार पडली. अध्यक्षपदावरून ते बोलत होते.



बैठकीस संशोधन संचालक डॉ. खिजर बेग, विस्तार शिक्षण संचालक डॉ. राकेश अहिरे, सहयोगी संचालक (संशोधन) डॉ. सूर्यकांत पवार, विभागीय कृषी सहसंचालक सुनील वानखेडे, डॉ. संजय पाटील, दीपक गवळी हे प्रत्यक्ष व संचालक (शिक्षण) डॉ. भगवान आसेवार, लातूरचे विभागीय कृषी सहसंचालक तिर्थंकर, विविध कृषी महाविद्यालयांचे प्राचार्य, विभाग प्रमुख, कृषी संशोधन केंद्रांचे प्रमुख, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, कृषी विज्ञान केंद्रांचे कार्यक्रम समन्वयक आणि विस्तार कृषी विद्यावेत्ता हे ऑनलाइन उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. इंद्र मणि यांनी 'शेतकरी देवो भव' ही संकल्पना मांडत, विद्यापीठाच्या संशोधन व तंत्रज्ञान विभागामार्फत विकसित करण्यात आलेली तंत्रज्ञान शिफारस थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याचे आवाहन केले. बदलत्या हवामानाशी सुसंगत तंत्रज्ञानाचा वापर, उत्पादन खर्चात कपात आणि संभाव्य नुकसान टाळण्यासाठी शास्त्रीय मार्गदर्शनाची नितांत आवश्यकता आहे. सद्य स्थितीत शेतकऱ्यांनी पुरेसा पाऊस झाल्याशिवाय पेरणी करू नये. कमी कालावधीच्या पिकांची निवड करावी, बीबीएफ पद्धतीने पेरणी,आंतरपीक पद्धतीचा वापर, पाण्याचा कार्यक्षम वापर, चारा पिकांचे नियोजन करण्याचे आव्हान केले.

प्रास्ताविक डॉ. सूर्यकांत पवार म्हणाले की, चारही कृषी विद्यापीठांच्या संयुक्त कृषी संशोधन परिषदेतील शिफारशी तसेच विद्यापीठाच्या तंत्रज्ञान कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांपर्यंत प्रभावी पोहोचविण्याच्या दृष्टीने या बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

पिकांसंबंधी अडचणी समजून घेऊन, हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर आवश्यक तंत्रज्ञानाचा विस्तार करण्यासाठीही प्रयत्न केले जातात.

कृषी सहसंचालक वानखेडे व तीर्थंकर यांनी उपयुक्त व नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्याच्या दृष्टीने खजूर, अॅव्होकॅडो, राजमा, ड्रॅगन फ्रूट, देशी कापूस, फळबाग लागवडीसह विविध बाबींवर मार्गदर्शन व यावरील संशोधनाची आवश्यकता असल्याचे सांगितले. बैठकीचे सूत्रसंचालन डॉ. एस. बी. कदम यांनी, तर आभार डॉ. आशिष बागडे यांनी मानले. बैठक यशस्वीतेसाठी डॉ. डी. एस. मुटकुळे, डॉ. दिलीप हिंगोले, रामेश्वर ठोंबरे आदींनी प्रयत्न केले.

## परभणीत एकल महिला धोरणाबाबत जिल्हास्तरीय कार्यशाळा

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी :** एकल महिला धोरण अधिक व्यापक आणि लोकाभिमुख व वास्तववादीत करण्याच्या दृष्टीने नागरिक एकल महिला स्वयंसेवी संस्था सामाजिक कार्यकर्ते अभ्यासक तज्ञ व्यक्ती व संबंधित विभागाचे अधिकारी यांच्याकडून सूचना व अभि प्राप्त करण्यासाठी मंगळवार दिनांक 23 जून रोजी 2026 रोजी सकाळी 11 वाजता जिल्हा परिषदेच्या सभागृहात जिल्हास्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलेले आहे.

एकल महिलांच्या सामाजिक आर्थिक अन्य शैक्षणिक कायदेशीर आरोग्य विषयक व पुनर्वसना संदर्भात प्रश्नाचा सर्वकास विचार करून त्यांच्यासाठी एक स्वातंत्र्य प्रभावी धोरण तयार करण्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्थसंकल्प अधिवेशनामध्ये घोषणा केलेली आहे त्यानुसार महिला व बालविकास मंत्री तथा राज्यमंत्री यांच्या मार्गदर्शनाखाली आयुक्त महिला बालविकास यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय मसुदा समिती घटित करण्यात आलेली आहे दिनांक 23 जून रोजी आयोजित कार्यशाळेसाठी नागरिक एकल महिला स्वयंसेवी संस्था सामाजिक कार्यकर्ते अभ्यासक तज्ञ व्यक्ती संबंधित विभागाचे अधिकारी यांनी उपस्थित रहावे असे आवाहन जिल्हा परिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी( बालकल्याण) यांनी केले आहे

## इद्रिस मुलतानी यांच्या पाठपुराव्याची माहिती नागरिकांना देताना गुलाबराव पाटील कोलते

**सावळदबारा :** जालना जिल्ह्यातील भोकरदन तालुक्यातील श्रीक्षेत्र जाळीचा देव ते सावळदबारा सिन्हा घाट या रस्त्याला जिल्हा मार्ग अथवा ग्रामीण मार्ग म्हणून मान्यता देऊन अधिकृत क्रमांक देण्यात यावा, अशी मागणी भाजपचे अल्पसंख्याक मोर्चा प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी यांनी सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांची मुंबई येथे मंत्रालयात भेट घेऊन निवेदनाद्वारे केली आहे



फर्दापूर-सावळदबारा सर्कलमधील विविध विकासकामांसाठी मागील काही महिन्यांपूर्वी भाजपचे अल्पसंख्याक मोर्चा प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी यांनी दिल्ली येथे जाऊन केंद्रीय मंत्री तसेच मुंबई येथील मंत्रालयात विविध मंत्री याची भेट घेत सावळदबारा सह परिसरातील मागण्यांची निवेदने सादर केली होती. सातत्याने पाठपुरावा देखील ते करत असल्याची माहिती भाजपचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते यांनी दि. १८ जून रोजी नागरिकांना दिली.

भाजपचे अल्पसंख्याक मोर्चा प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी यांच्या प्रयत्नांमुळे फर्दापूर गावासाठी पाणीपुरवठा योजनेसाठी शासनाकडून ५० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

सावळदबारा, डाभा, घाणेगाव, मोलखेडा, रवळा, जवळा, जामठी, देव्हारी, महालब्धा, पिंपळवाडी, नांदा तांडा, नांदगाव आदी परिसरातील नागरिकांना ही माहिती देताना भाजपचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते उपस्थित होते.

जालना जिल्ह्यातील भोकरदन तालुक्यातील श्रीक्षेत्र जाळीचा देव ते सावळदबारा सिन्हा घाट या रस्त्याला जिल्हा मार्ग अथवा ग्रामीण मार्ग म्हणून मान्यता देऊन अधिकृत क्रमांक देण्यात यावा, अशी मागणी भाजपचे अल्पसंख्याक मोर्चा प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी यांनी सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांची मुंबई येथील मंत्रालयात भेट घेऊन निवेदनाद्वारे केली आहे.

सावळदबारा येथील भाजपचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते यांच्या संपर्क कार्यालय येथे सावळदबारा व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अंबड येथील लाच घेताना अटक झालेल्या तहसीलदार विजय चव्हाण यांना जामीन मंजूर

### आठवड्यातून दोनदा पोलीस ठाण्यात हजेरीची अट

**छत्रपती संभाजीनगर :** अंबड तालुक्यातील कथित वाळू माफिया प्रकरणात लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात अडकलेले आणि त्यानंतर अटक करण्यात आलेले तहसीलदार विजय चव्हाण यांना न्यायालयाने सशर्त जामीन मंजूर केला आहे. न्यायालयाने ७५ हजारांच्या जामिनावर त्यांची सुटका करण्याचे आदेश दिले असून तपास प्रक्रियेला बाधा येऊ नये यासाठी काही कठोर अटी घालून दिल्या आहेत.

न्यायालयाच्या आदेशानुसार विजय चव्हाण यांनी आठवड्यातून दोन वेळा संबंधित पोलीस ठाण्यात हजेरी लावणे बंधनकारक राहणार आहे. तसेच प्रकरणातील साक्षीदारांशी थेट अथवा अप्रत्यक्ष संपर्क साधण्यास त्यांना मनाई करण्यात आली आहे. तपासात पूर्ण सहकार्य करण्याचे निर्देशही न्यायालयाने दिले आहेत. जामीन मंजूर करताना न्यायालयाने अटींचे काटेकोर पालन करण्यावर भर दिला. जामिनाच्या अटींचे उल्लंघन झाल्यास त्यांचा जामीन रद्द केला जाऊ शकतो, असा स्पष्ट इशारा न्यायालयाने दिला आहे. त्यामुळे तपास प्रक्रियेत कोणताही हस्तक्षेप होणार नाही, याची खबरदारी घेण्यास सांगण्यात आले आहे.

अंबड तालुक्यातील वाळू उत्खनन आणि वाहतुकीशी संबंधित प्रकरणात आर्थिक व्यवहार झाल्याच्या तक्रारीनंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचून कारवाई केली होती. या कारवाईत तहसीलदार विजय चव्हाण यांना लाच स्वीकारताना रंगेहात पकडण्यात आले होते. या घटनेनंतर जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली होती. शासनाने त्यांच्यावर निलंबनाची कारवाई केली होती, तर तपास यंत्रणांनी प्रकरणातील आर्थिक व्यवहार आणि संबंधित कागदपत्रांची छाननी सुरू केली होती.

दरम्यान, न्यायालयाकडून जामीन मंजूर झाल्याने विजय चव्हाण यांना तात्पुरता दिलासा मिळाला असला तरी भ्रष्टाचार प्रकरणाचा तपास अद्याप सुरू आहे. त्यामुळे या प्रकरणातील पुढील सुनावणी आणि तपासातून समोर येणाऱ्या नव्या घडामोडींकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## बुलंद छावा मराठा युवा परिषद छत्रपती संभाजीनगर जिल्हा सचिवपदी ज्ञानेश्वर वाघ यांची निवड

हिंदू प्रकाशवार्ता । प्रतिनिधी

सोयगाव,दि.१९ जून : बुलंद छावा मराठा युवा परिषदेच्या छत्रपती संभाजीनगर जिल्हा सचिवपदी ज्ञानेश्वर वाघ(घोसला ता.सोयगाव)यांची अत्यंत प्रतिष्ठेने नियुक्ती करण्यात आली आहे. संघटनेचे प्रदेश सचिव सुरेश वाकडे यांच्या शुभहस्ते वाघ यांना अधिकृत नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

ज्ञानेश्वर वाघ यांनी आजवर सामाजिक क्षेत्रात केलेल्या अविरत आणि उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन संघटनेने त्यांच्यावर ही महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपवली आहे. नियुक्तीपत्र प्रदान करताना उपस्थितांनी त्यांच्या भावी सामाजिक वाटचालीस भरभरून शुभेच्छा दिल्या.



"संघटना तळागाळापर्यंत पोहोचवून अधिक बळकट करणे, तसेच समाजहिताच्या विविध उपक्रमांमध्ये तरुणांचा सक्रिय सहभाग वाढवून भरीव योगदान देणे हेच आमचे मुख्य उद्दिष्ट असेल," असा विश्वास याप्रसंगी व्यक्त करण्यात आला.ज्ञानेश्वर वाघ आता बुलंद छावा मराठा युवा परिषदेचे छत्रपती संभाजीनगरचे नवे जिल्हा सचिव.

सामाजिक क्षेत्रातील भरीव योगदानाची दखल घेत निवड.

संकल्प:संघटना बळकट करणे आणि समाजोपयोगी उपक्रमांना गती देणे.प्रमुख पदाधिकाऱ्यांची उपस्थिती

या महत्त्वपूर्ण निवड सोहळ्याप्रसंगी संघटनेचे प्रदेश कार्याध्यक्ष सतीश वेताळ,युवा जिल्हाध्यक्ष संदीप जाधव, धुळे जिल्हाध्यक्ष हंसराज पाटील,शहराध्यक्ष योगेश देशमुख, आणि तालुकाध्यक्ष शिवाजी पळसकर प्रामुख्याने उपस्थित होते. यासोबतच डॉ.कृष्णा कदम,रामेश्वर राजगुरे,दिलीप जाधव,ऋषिकेश मोहिते,शिवनाथ वाडेकर आणि विष्णू आमटे यांच्यासह संघटनेचे इतर अनेक सन्माननीय पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी ज्ञानेश्वर वाघ यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.

## सैनिकी मुला-मुलींचे वसतीगृह, विश्रामगृहासाठी कंत्राटी पदभरती; 29 जूनपर्यंत अर्ज मागविले

**छत्रपती संभाजीनगर :** जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाच्या अंतर्गत संचलित सैनिकी मुला-मुलींचे वसतीगृह, सैनिकी विश्रामगृह आणि कारगिल स्मृतीवन येथे विविध पदांसाठी तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पद्धतीने भरती प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

## एल निनोच्या सावटाखाली संभाव्य पाणीटंचाईचा धोका; पिण्याच्या पाण्याचा काटेकोर वापर करा

# पाणी अपव्यय रोखण्यासाठी विशेष जनजागृती मोहीम राबविणार – मुख्य कार्यकारी अधिकारी

हिंदू प्रकाशवार्ता :प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** राज्यात एल निनोच्या प्रभावामुळे मान्सूनला विलंब होत असून आगामी काळात गंभीर पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याचा अत्यंत काटेकोर व प्राधान्याने वापर करावा, असे आवाहन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम. यांनी केले आहे.

राज्याचे मुख्य सचिव तसेच जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांच्या सूचनांनुसार जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींना संभाव्य पाणीटंचाईचा सामना करण्यासाठी तातडीने उपाययोजना राबविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. पिण्याच्या पाण्याचा अपव्यय रोखणे, उपलब्ध जलस्रोतांचे योग्य नियोजन करणे आणि नागरिकांमध्ये पाणी बचतीबाबत व्यापक जनजागृती करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

ग्रामपंचायतींनी गावातील विहिरी, बोअरवेल, पाणीपुरवठा योजना व इतर जलस्रोत कार्यान्वित स्थितीत ठेवण्यासाठी आवश्यक दुरुस्ती तातडीने करावी. पाणीपुरवठा योजनांमधील गळती, अनधिकृत नळजोडण्या आणि पाण्याची चोरी रोखण्यासाठी विशेष मोहीम राबवावी. तसेच वाहन धुणे, बागांना पाणी देणे यांसारख्या गैर-प्राधान्य कामांसाठी पिण्याच्या पाण्याचा वापर टाळण्याबाबत नागरिकांना सूचना देण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

### ग्रामपंचायतींसाठी महत्त्वाच्या सूचना

**पिण्याच्या पाण्याचा अपव्यय रोखा., गळती, पाणी चोरी व अनधिकृत नळजोडण्या थांबवा., जलस्रोतांची दुरुस्ती व देखभाल तातडीने करा., टंचाईग्रस्त गावांसाठी पर्यायी जलस्रोतांची तयारी ठेवा., पाणी बचत, जलसंधारण व भूजल पुनर्भरणाबाबत जनजागृती करा., पाणी साठा ३० दिवसांपेक्षा कमी असल्यास प्रशासनाला तात्काळ कळवा.**

पाणीपुरवठा योजनांची वीजबिले व देखभाल वेळेत पूर्ण करून योजना अखंडित सुरू राहतील याची दक्षता घेण्यास सांगण्यात आले आहे. टंचाईग्रस्त होण्याची शक्यता असलेल्या गावांमध्ये पर्यायी विहिरी, बोअरवेल तसेच अन्य जलस्रोत उपलब्ध करून देण्यासाठी पूर्वतयारी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

यासोबतच जलसंधारण, पावसाचे पाणी साठवणूक, भूजल पुनर्भरण याबाबत ग्रामस्तरावर जनजागृती करण्यावर भर देण्यात आला आहे. पाणी गुणवत्तेची नियमित तपासणी करून नागरिकांना सुरक्षित व शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याचे निर्देशही प्रशासनाने दिले आहेत.

संभाव्य पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर तालुकास्तरावर नियंत्रण कक्ष स्थापन करून परिस्थितीवर सतत लक्ष ठेवण्यास सांगण्यात आले आहे. पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांमधील उपलब्ध साठा ३० दिवसांपेक्षा कमी असल्यास त्याबाबतचा अहवाल तात्काळ जिल्हा प्रशासनाकडे सादर करावा, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

शासकीय कार्यालये, शाळा, अंगणवाड्या, महाविद्यालये आणि इतर सार्वजनिक संस्थांमध्ये पाणी बचतीबाबत विशेष सूचना देऊन त्यांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू असल्यास वितरण प्रक्रियेत पारदर्शकता राखून नियमित नोंदी ठेवाव्यात आणि जीपीएस यंत्रणेद्वारे नियंत्रण ठेवावे, असेही नमूद करण्यात आले आहे.

महसूल, पंचायत समिती, ग्रामपंचायत, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग आणि संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करून संभाव्य पाणीटंचाईला सामोरे जाण्याचे आवाहन करण्यात आले आहे. "पाणी आहे तितकेच वापरा, पाणी वाचवा" हा संदेश दवंडी व जनजागृती मोहिमांद्वारे प्रत्येक गावापर्यंत पोहोचविण्यात येणार असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम. यांनी सांगितले.

# जिल्ह्यातील 2.83 लाख बालकांना पोलिओचे संरक्षण कवच; पल्स पोलिओ मोहिमेसाठी आरोग्य यंत्रणा सज्ज

## आरोग्य विभागाच्या मासिक आढावा बैठकीत विविध योजनांचा सखोल आढावा

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर** : जिल्ह्यातील एकही बालक पोलिओ प्रतिबंधक लसीकरणापासून वंचित राहू नये, या उद्देशाने आगामी पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेसाठी आरोग्य विभागाने व्यापक नियोजन सुरू केले असून ० ते ५ वर्षे वयोगटातील तब्बल २ लाख ८३ हजार ३७० बालकांना लसीकरणाचा लाभ देण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. या मोहिमेसाठी जिल्हाभरात २ हजार २४१ लसीकरण बूथ, ५०० पर्यवेक्षक पथके आणि आवश्यक आरोग्य मनुष्यबळाची नियुक्ती करण्यात येणार आहे.

जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगरच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनू पी. एम. यांच्या मार्गदर्शनाखाली वेरूळ सभागृहात आरोग्य विभागाची मासिक आढावा बैठक तसेच पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेची कार्यशाळा उत्साहात पार पडली. यावेळी जागतिक आरोग्य संघटनेचे (WHO) सर्व्हेलन्स ऑफिसर डॉ. मुजीब सय्यद यांनी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांना मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत मार्गदर्शन केले.

मोहिमेदरम्यान प्रत्येक पात्र बालकापर्यंत पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब पोहोचविण्यासाठी सूक्ष्म नियोजन, घरभेटी, जनजागृती, विशेष पथकांची जबाबदारी आणि पर्यवेक्षण याबाबत सविस्तर सूचना देण्यात आल्या. लसीकरण मोहिमेच्या यशासाठी सर्व स्तरांवर समन्वय साधण्यावर भर देण्यात आला.

बैठकीत नियमित लसीकरण, एचपीव्ही लसीकरण, माता-बाल आरोग्य सेवा, संसर्गजन्य रोग नियंत्रण, राष्ट्रीय आरोग्य अभियान, आयुष्मान भारत व महात्मा फुले जनआरोग्य योजनेंतर्गत लाभार्थी नोंदणी, 'माझं गाव आरोग्य संपन्न गाव' अभियान, कुष्ठरोग सर्व्हेलन्स, यू-विन पोर्टलवरील प्रगती, राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम तसेच १०० दिवसांचे क्षयरोग निर्मूलन अभियान यांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर संभाव्य साथीच्या रोगांवर नियंत्रण ठेवण्यासाठी आवश्यक औषधसाठा, साथरोग नियंत्रण किटची उपलब्धता आणि तातडीच्या प्रतिसाद यंत्रणेची तयारी याबाबतही महत्त्वाच्या सूचना देण्यात आल्या. तसेच २१ जूनच्या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या आयोजनासह १९ जून जागतिक सिकलसेल दिनानिमित्त जिल्हाभर राबविण्यात येणाऱ्या सिकलसेल जनजागृती पंधरवड्याचे नियोजनही बैठकीत करण्यात आले.

कार्यशाळेस प्रभारी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. विशाल बेंद्रे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. छाया आवर्गावकर, सहायक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. शैलजा कुप्पस्वामी, सहाय्यक संचालक (कुष्ठरोग) डॉ. हलकुडे यांच्यासह सर्व तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, आरोग्य पर्यवेक्षक आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

"जिल्ह्यातील प्रत्येक बालकापर्यंत पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब पोहोचविण्यासाठी आरोग्य यंत्रणा सज्ज असून पालकांनीही या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवावा," असे आवाहन आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात आले.

# स्कुटीचोर जेरबंद; जळगावातून आरोपीला अटक

## जवाहर कॉलनीतील ॲक्टिव्हा चोरी उघड; जवाहरनगर पोलिसांची कारवाई

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर** : जवाहर कॉलनी चौकातील ममता ग्लास दुकानासमोरून चोरीस गेलेली ॲक्टिव्हा स्कुटी अवघ्या काही दिवसांत शोधून काढत जवाहरनगर पोलिसांनी जळगाव जिल्ह्यातून आरोपीला अटक केली आहे. सीसीटीव्ही फुटेज, गुप्त माहिती आणि सायबर सेलच्या तांत्रिक मदतीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली.

संजय पांडुरंग नवाडे (वय 58, रा. पुष्कर अपार्टमेंट, आदिनाथनगर) यांनी 9 जून रोजी सकाळी सात वाजेच्या सुमारास त्यांची काळ्या रंगाची ॲक्टिव्हा (एमएच-20-एचई-4599) ममता ग्लास दुकानासमोर उभी केली होती. काही वेळातच अज्ञात चोरट्याने ती लंपास केली. सुमारे 40 हजार रुपये किंमतीची ही दुचाकी चोरीला गेल्याप्रकरणी जवाहरनगर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक 238/2026, कलम 303(2) भारतीय न्याय संहिता अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हा दाखल होताच बिट मार्शल पोलीस अंमलदार मारोती गोरे यांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सुरुवात केली. फुटेज आणि गुप्त माहितीच्या आधारे आरोपीची ओळख पटविण्यात आली. आरोपी चोरी केल्यानंतर जळगाव जिल्ह्यात पळून गेल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलीस निरीक्षक सचिन कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथक तयार करण्यात आले.

महिला पोलीस हवालदार रत्नमाला धुळे आणि पोलीस अंमलदार मारोती गोरे यांनी सायबर सेलच्या तांत्रिक मदतीने आरोपीचा माग काढला. 18 जून रोजी जळगाव जिल्ह्यातील शिवाजीनगर स्मशानभूमी परिसरातून विक्की उर्फ सुक्का सांडू यादव (वय 32) याला ताब्यात घेण्यात आले. चौकशीदरम्यान त्याने ॲक्टिव्हा चोरी केल्याची कबुली दिली. त्यानंतर त्याला अटक करण्यात आली.

पोलिसांच्या तपासात आरोपीविरुद्ध यापूर्वीही जळगाव शहर पोलीस ठाण्यात शरीराविरुद्धच्या स्वरूपाचे चारपेक्षा अधिक गुन्हे दाखल असल्याचे उघड झाले आहे. आरोपीच्या कबुलीजबाबामुळे चोरीचा गुन्हा उघडकीस आला असून चोरीस गेलेली दुचाकीही जप्त करण्यात आली आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त प्रवीण पवार, पोलीस उपआयुक्त रत्नाकर नवले, सहाय्यक पोलीस आयुक्त मनीष कल्याणकर आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. गुन्ह्याचा तपास करणाऱ्या महिला पोलीस हवालदार रत्नमाला धुळे आणि पोलीस अंमलदार मारोती गोरे यांच्या कामगिरीचे वरिष्ठांनी कौतुक केले आहे.

# पोलीस निरीक्षक नांदेड येथील नियंत्रण कक्षात तर आठ अंमलदाराची बदली; चौकशीचे आदेश

## आ.रत्नाकर गुट्टे यांच्या 24 तास अल्टिमेटमच्या संदर्भात प्रशासनाने उचलली ठोस पाऊल

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी



**परभणी** : परभणी जिल्ह्यातील अवैध व्यवसायांना स्थानिक गुन्हे शाखेचे सर्वेक्षण असल्याचा गंभीर तक्रारीनंतर पोलीस प्रशासनाने मोठी कारवाई करत स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक यांना नांदेड नियंत्रण कक्षात या शाखेतील आठ अमलदाराची बदली करण्यात आली आहे मिळालेल्या अधिक माहितीनुसार परभणी जिल्ह्यातील अवैध व्यवसाय विषयी पोलीस महा उपनिरीक्षकाकडे आमदार रत्नाकर गुट्टे आणि तक्रार दाखल केली होती त्यात प्रशासनाला 24 तासाचा अल्टीमेटम दिला होता या तक्रारीची गंभीर दखल घेत पोलीस उप महानिरीक्षक. श्री शहाजी उमाप यांनी संबंधित प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत चौकशीचे जबाबदारी नांदेड जिल्हा अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती अर्चना पाटील यांच्याकडे सोपविण्यात आली आहे या दरम्यान परभणी येथील स्थानिक गुन्हा शाखेचे पोलीस निरीक्षक श्री गजेंद्र सरोदे यांची नियंत्रण कक्षनांदेड येथे बदली करण्यात आली असून स्थानिक गुना शाखेतील नेमणुकीवर असलेल्या आठ अंमलदारांना पोलीस मुख्यालय परभणी येथे बदली करण्यात आली आहे अवैध व्यवसाय विरोधात कठोर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले असून परभणी जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस प्रशासनाने ही महत्त्वाची पाऊली उचलली असे समजले जाते आहे.

# 21 व्या शतकातही वडार समाजाला समशान भूमी नसल्यामुळे मृतदेहाची आवहेलना

## गौर येथे अद्यापहीवडार समशानभूमी नसल्याने अंत्यविधीस अडचण; वडार समाज संतप्त

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी



**परभणी** : गावोगावी शासनाच्या वतीने अनेक योजना चालू असताना आजही वडार समाजाला समशान भूमी उपलब्ध होत नसल्याने पूर्णा तालुक्यातील गौर येथे हक्काचे समशानभूमी उपलब्ध नसल्याने वडार समाजासमोर अंत्यविधीचा मोठा प्रश्न उभा टाकला आहे एका अल्पवयीन मुलीचा मृत्यू झाल्याने तिच्यावर अंत्यसंस्कार कुठे करावेत असा प्रश्न उपस्थित करत वडार समाजाने त्याला पण मुलीचा मृतदेह थेट कार्यालयासमोर आणून ठेवला व मृतदेहाजवळ बसून शासनाचा अधिकार करत आंदोलन केले. गौर येथील वडार समाजामधील सरस्वती सुरेश पवार या अल्पवयीन मुलीचे शुक्रवार दिनांक 19 जून रोजी पहाटे अल्पशा आजाराने निधन झाले यावेळी अंत्यसंस्कारासाठी गावात समाजाची स्वातंत्र्य समशानभूमी नसल्यामुळे उतरत कुठेही अंत्यसंस्कार करू दिला नसल्याने गावात थोडे तणावाचे वातावरण निर्माण झाले संत नातेवाईकांनी व समाज बांधवांनी मुलीचा मृतदेह तिरडीवर ठेऊन थेट पूर्णा तहसील कार्यालय गाठले व मृतदेह तहसील कार्यालयासमोर आणून ठेवला प्रशासकीय अधिकाऱ्याला जाब विचारला मृतदेहला अग्नी कुठे द्यायचा असा टाहो फोडला तहसील कार्यालयात काही वेळ तणावाचे वातावरण निर्माण झाले मागील अनेक वर्षापासून वडार समाजाने समशानभूमीची मागणी करत आहेत यासाठी प्रशासनाकडे वारंवार अर्ज निवेदने देण्यात आली मात्रठोस कारवाई झाली नसल्याने व प्रशासनाकडून कुठल्याही प्रकारचा न्याय न मिळाल्याने लेखी आश्वासन मिळेपर्यंत आंदोलन मागे घेण्यात येणार नाही असा पवित्रा आंदोलनकर्त्यांनी घेतला या आंदोलनामुळे प्रशासनातील अधिकाऱ्याची पाचावर धारण बसली मोठी तारांबळ उडाली तहसील कार्यालय धावपळ सुरू झाली अनेक नागरिकांनी बघायची भूमिका घेतली एकविसाव्या शतकातही सर्वसामान्य समाजाला दफन विधीसाठी जागा मिळत नसल्याने गौर येथील समशान भूमीचा प्रश्न चव्हाट्यावर आला आहे शासन कधी सोडणार याकडे सर्वांचे लक्ष लागले.









मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911